# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०२.१०.२०२५ गुरूवार**

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०१.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०३ केसेस, तसेच एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०१ केसेस असे एकुण ०४ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून रू. १,४९,५००/– चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून रू. १८,६५७/– चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ६२० वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. २,५९,१००/– रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :– हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक ०१.१०.२०२५ चे २०.५० वा. चे सुमारास, राणाप्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, त्रिमुर्ती चौक जवळ एक हद्दपार ईसम मोपेडवरून धूमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसल्याने त्यास हटकले असता तो पळु लागला, त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव मंथन उर्फ दद्या संतोष दाभने वय २३ वर्ष रा. गल्ली नं. २, तुकडोजी नगर, टेलिफोन एक्सचेंज मागे, लकडगंज, नागपूर असे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता पॅन्टचे आत कमरेत एक लोखंडी धारदार अन्ना चाकु, दोन मोबाईल फोन व सुझूकी एक्सेस गाडी क्र. एम.एच ३१ एफ.एन ७४६२ असा किंमती अंदाजे ७८,७००/– रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणुन अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२४ दि. १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षा करीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने आपले जवळ चाकु बाळगुन समक्ष धुमधाम करतांना मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४/२५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे लकडगंज :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०१.१०.२०२५ चे १३.३० वा. चे सुमारास, टाईल्स फिटींग काम करणारे फिर्यादी किशोरीलाल रमेश वर्मा, वय ३८ वर्षे, रा. वार्ड नं. ९, अमरवाडा, जि. छिंदवाडा, म.प्र यांनी त्याचे ठेकेदाराकडुन मजूरी कामाचे १४,५००/—रू. घेवुन आपले गावी जाण्याकरीता ईतवारी रेल्वे स्टेशन येथे आले व त्यांचे एका परिचीत ड्रायव्हर कडे बॅग ठेवुन ते गंगाजमुना वस्ती येथे फिरण्यासाठी गेले असता, त्यांना आरोपी क्र. १) दिपाली समाधान इंगळे वय ३५ वर्ष २) जुगनू ज्ञानेश्वर वानखेडे वय ३० वर्ष दोन्ही रा. गंगा जमुना वस्ती लकडगंज, नागपूर यांनी संगणमत करून आरोपी क्र. १ हिने फिर्यादीस खर्रा मागीतला व फिर्यादी हे तिचे सोबत रूममध्ये गेले असता, आरोपी क्र. १ व २ यांनी अधिक पैश्याची मागणी करून आरोपी क्र. २ याने लाकडी दांडयाने व हातबुक्कीने मारहाण करून आरोपींनी फिर्यादीचे पर्समधून १४,७००/—रू. जबरीने हिसकावून घेतले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(६), ११५, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला.

लकडगंज पोलीसांनी त्वरीत दखल घेवुन, आरोपींना निष्पन्न करून, आरोपी क्र. १ हिला अटक केली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**